जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे



BLUEVORA
WITH ADDED MINERALS
Pure, Clean & Natural
PACKAGED DRINKING WATER



दैनिक | वर्ष १ | अंक २२० | शुक्रवार, ६ मार्च २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210


## संक्षिप्त

### विश्रांतवाडीत ज्येष्ठ नागरिकाचे पाकीट लंपास

**पुणे, ता. ५ :** शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत पुन्हा एकदा प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न समोर आला आहे. पीएम पीएमएल बसमध्ये प्रवास करत असताना एका ज्येष्ठ नागरिकाच्या खिशातील ५० हजार रुपयांची रोकड चोरट्यांनी चोरून नेल्याची घटना विश्रांतवाडी परिसरात घडली आहे. या घटनेमुळे बसम धील गर्दीत होणाऱ्या चोरीच्या प्रकारांबाबत चिंता व्यक्त केली जात आहे. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार ७३ वर्षीय ज्येष्ठ नागरिक हे विश्रांतवाडीतील धानोरी भागात राहतात. २६ फेब्रुवारी रोजी दुपारी ते विश्रांतवाडी ते कोथरूड या मार्गावरील पीएमपीएमएल बसने प्रवास करत होते. बसमध्ये मोठी गर्दी असल्याने काही चोरट्यांनी त्याचा फायदा घेतल्याचे सांगितले जात आहे. प्रवासादरम्यान दोन अनोळखी व्यक्तींनी जाणीवपूर्वक ज्येष्ठ नागरिकाला धक्काबुक्की केली. गर्दीचा फायदा घेत त्यांनी त्यांच्या खिशातील ५० हजार रुपयांची रोकड शिताफीने काढून घेतली. काही वेळानंतर बस शांतीनगर थांब्यावर पोहोचल्यावर दोघेही चोरटे घाईघाईने बसमधून उतरले आणि गर्दीत मिसळून पळून गेले.

# लोणी काळभोरमध्ये कचऱ्यावरून एमआयटीच्या गेटवर तुफान राडा!

## डीसीपी डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मध्यस्थीनंतर तणाव निवळला

## कचरा प्रकल्पासाठी प्रशासनाला सात दिवसांची मुदत

**लोणी काळभोर, ता. ५ :** पुणे शहराची जीवनवाहिनी मानल्या जाणाऱ्या मुळा-मुठा नदीपात्रात कोणतीही प्रक्रिया न करता अवैधरित्या टाकण्यात येणारा कचरा तात्काळ बंद करावा, या मागणीसाठी एमआयटी आर्ट, डिझाईन अँड टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुलातील विद्यार्थ्यांनी छेडलेले कचरा बंद आंदोलन गुरुवारी तुफान गोंधळानंतर अखेर सात दिवसांसाठी स्थगित करण्यात आले. पोलिस उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे आणि लोणी-काळभोरच्या सहाय्यक पोलिस आयुक्त अनुराधा उदमले यांनी घटनास्थळी धाव घेत मध्यस्थी केल्यानंतर तणाव निवळला.

लोणी काळभोर (ता. हवेली) येथील एमआयटी विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वारावर गुरुवारी सकाळी साडेदहाच्या सुमारास कदमवाकवस्ती व लोणी काळभोर ग्रामपंचायतींच्या



कचऱ्याच्या गाड्या पोहोचल्या. मात्र, मुळा-मुठा नदीपात्रात कचरा टाकण्यास विरोध करत एमआयटी प्रशासनाने या गाड्या गेटवरच अडविल्या. यानंतर ग्रामस्थ व विद्यापीठ प्रशासनामध्ये जोरदार वाद निर्माण झाला आणि काही काळ परिसरात तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले. या वेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक प्रशांत काळभोर, लोणी काळभोरचे सरपंच नागेश काळभोर, माजी सरपंच राहुल काळभोर, भोलेनाथ शेलार, कदम वाकवस्तीचे माजी सरपंच चित्तरंजन गायकवाड, उपसरपंच नासीर पठाण, माजी उपसरपंच राजेंद्र काळभोर, रमेश भोसले, युवराज काळभोर यांच्यासह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

एमआयटी एडीटी विद्यापीठाचे कार्याध्यक्ष प्रा. डॉ. मंगेश कराड आणि दोन्ही गावांतील पदाधिकारी, ग्रामसेवक, ग्रामपंचायत सदस्य तसेच आजी-माजी जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य यांच्यात कचरा वाहतुकीवरून दोनदा चर्चा झाली. मात्र, तोडगा निघत नसल्याने वाद अधिकच चिघळला. कचऱ्याचा ट्रॅक्टर विद्यापीठ परिसरात नेण्यावरून दोन्ही बाजूंमध्ये जोरदार खडाजंगी झाली. गावचे पुढारी ट्रॅक्टर आत नेण्यावर ठाम होते, तर एमआयटी प्रशासनाने गेट बंद करत दोन बस आडव्या लावून कचरा वाहतुकीस विरोध दर्शवला.

वाद चिघळण्याची शक्यता निमाण होताच पुणे शहर पोलिसांचे उपायुक्त डॉ. राजकुमार शिंदे घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी दोन्ही बाजूंची मते शांतपणे ऐकून घेत मध्यस्थी केली. त्यांच्या हस्तक्षेपानंतर अखेर तात्पुरता तोडगा काढण्यात आला. त्यानंतर विद्यार्थ्यांनी कचरा बंद आंदोलन सात दिवसांसाठी स्थगित करण्याचा निर्णय घेतला. या कालावधीत लोणी-काळभोर व कदमवाकवस्ती ग्राम पंचायतींनी कचरा व्यवस्थापनासाठी कायमस्वरूपी प्रकल्प उभारण्याचा मार्ग काढावा, अशी अट घालण्यात आली आहे. तोपर्यंत ओला आणि सुका कचरा वेगळा करून आणलेले ट्रॅक्टर नदीपात्रात सोडण्यास तात्पुरती मुभा देण्यात आली आहे. मात्र, सात दिवसांत कचऱ्याच्या प्रश्नावर ठोस तोडगा न निघाल्यास विद्यापीठ प्रशासन दोन्ही ग्रामपंचायतींच्या कचऱ्याच्या गाड्यांना प्रवेश देणार नाही, असा इशाराही विद्यार्थ्यांनी दिला आहे. दरम्यान, मुळा-मुठा नदीपात्रातील कचऱ्याच्या ढिगाऱ्यांना २६ फेब्रुवारी २०२६ रोजी भीषण आग लागली होती. ही आग तब्बल चार दिवस धुमसत राहिल्याने परिसरात विषारी धुराचे मोठे लोट पसरले होते. या धुरामुळे एमआयटी एडीटी शैक्षणिक संकुलातील सहा ते सात विद्यार्थ्यांना श्वास घेण्यास त्रास होऊन गुदमरल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले होते. या घटनेनंतर विद्यार्थी, कर्मचारी व परिसरातील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला. त्यामुळे विद्यार्थ्यांनी पुढाकार घेत नदीपात्रात थेट कचरा टाकणे बंद करण्यासाठी कचरा बंद आंदोलन सुरू केले होते. पोलिसांच्या मध्यस्थीनंतर आंदोलन तात्पुरते स्थगित झाले असले, तरी सात दिवसांत प्रशासनाने ठोस उपाययोजना केल्या नाहीत तर पुन्हा तीव्र आंदोलन उभारण्याचा इशारा विद्यार्थ्यांकडून देण्यात आला आहे.

> पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील आणि शिरूर-हवेलीचे आमदार ज्ञानेश्वर उर्फ माऊली कटके यांच्या मार्गदर्शनाखाली मुळा-मुठा नदीपात्रात टाकल्या जाणाऱ्या कचऱ्याचा प्रश्न कायमस्वरूपी सोडवण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. मात्र एमआयटी प्रशासनाने अचानक त्यांच्या गेटमधून कचऱ्याच्या गाड्यांना बंदी घातल्याने दोन्ही गावांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला होता. सुरुवातीला चर्चा होऊनही तोडगा निघत नव्हता. अखेर डीसीपी डॉ. राजकुमार शिंदे यांच्या मध्यस्थीनंतर तात्पुरता मार्ग काढण्यात आला आणि कचऱ्याचा प्रश्न सध्या मार्गी लागला आहे.
> - **प्रशांत काळभोर,** संचालक, कृषी उत्पन्न बाजार समिती पुणे


> गेल्या काही वर्षांपासून कोणतेही वर्गीकरण न करता थेट मुळा-मुठा नदीपात्रात कचरा टाकला जात आहे. साचलेल्या कचऱ्याला वारंवार आग लागण्याच्या घटना घडतात आणि त्यातून होणाऱ्या वायू प्रदूषणामुळे आम्हा विद्यार्थ्यांना श्वास घेण्यास त्रास होतो. त्यामुळे या समस्येच्या मुळाशी असलेला कचरा नदीत टाकणे थांबवावे, या मागणीसाठी आम्ही कचरा बंद आंदोलन करत ग्रामपंचायतींच्या गाड्या अडवल्या. पोलिस उपायुक्तांच्या विनंतीनंतर आम्ही आंदोलन सात दिवसांसाठी स्थगित केले असून ग्रामपंचायतींना तोडगा काढण्यासाठी मुदत दिली आहे. तरीही नदीपात्रात कचरा टाकणे सुरू राहिल्यास पुन्हा गाड्या अडवून तीव्र आंदोलन उभारले जाईल.
> - **दादासाहेब भोसूरे,** विद्यार्थी प्रतिनिधी

# वडगाव रासाईत हक्काच्या पाण्यासाठी शेतकरी कालव्यात अर्धनग्न आंदोलन

**योगेश मारणे**

न्हावरे, ता. ५ : वडगाव रासाई (ता. शिरूर) येथील शेलारवाडी परिसरात घोड प्रकल्पाच्या पाण्याच्या प्रश्नावर बुधवारी शेतकऱ्यांचा संताप टोकाला पोहोचला. कमी दाबाने पाणीपुरवठा होत असल्याच्या निषेधार्थ संतप्त शेतकऱ्यांनी अर्धनग्न होत थेट कालव्यात उतरून तीव्र आंदोलन छेडले. सुरू असलेल्या आवर्तनात घोड प्रकल्प प्रशासन पूर्णपणे निष्क्रिय असल्याचा आरोप करत आंदोलकांनी प्रशासनाविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

घोड प्रकल्पाच्या उजव्या कालव्यासाठी रविवारी आवर्तन सुरू करण्यात आले; मात्र चार दिवस उलटूनही टेलच्या भागातील कुरुळीपर्यंत पाणी पोहोचले नसल्याने टेलकडील शेतकरी हवालदिल



झाले आहेत. वडगाव रासाई येथील शेतकरी थेट कालव्यातून पाणी उपसा करत नसले, तरी कुरुळीकडे जाणाऱ्या पाण्यामुळे येथील विहिरी व कुपनलिकांची पाणीपातळी वाढण्यास मोठा फायदा होतो. मात्र, दरवर्षी पाणीपट्टी भरूनही उच्च दाबाने पाणी मिळत नसल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी आहे.

गतवर्षी कुरुळीपर्यंत पाणी पोहोचल्यानंतर प्रशासनाने अचानक पाणी बंद केल्याचा आरोपही शेतकऱ्यांनी केला. तसेच सुरू असलेले आवर्तन नियमित व पुरेशा दाबाने द्यावे. अशी वारंवार मागणी करूनही अधिकारी घटनास्थळी न आल्याने शेतकऱ्यांचा संताप अधिकच वाढला.घोड धरणाचे कनिष्ठ अभियंता महेश शिंदे व शाखाधिकारी महेश काळे यांना कालव्याची पाहणी करण्याची विनंती करण्यात आली होती; मात्र दुपारपर्यंत कोणीही हजर न राहिल्याने गोविंद शेलार, योगेश शेलार, ऋषिकेश परभाणे, अशोक शेलार, अमोल ढवळे, तुषार शेलार, सागर शेलार, संतोष सोनवणे आदी शेतकऱ्यांनी थेट कालव्यात उतरून आंदोलन केले.

आमच्या हक्काचे पाणी जाणीवपूर्वक अडवले जात आहे. काही ठिकाणी पैशांच्या जोरावर पाणी चोरी होत आहे. अधिकाऱ्यांच्या संगनमताशिवाय हे शक्य नाही, असा गंभीर आरोप आंदोलकांनी केला. पाणी चोरीला मूकसंमती देणाऱ्या अधिकाऱ्यांचे तात्काळ निलंबन करून सखोल चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली.

आंदोलनादरम्यान घोड प्रकल्प प्रशासनाचा तीव्र निषेध करण्यात आला. शेतकऱ्यांची पिके जळत असताना अधिकारी जबाबदारी झटकत आहेत. मोजक्या शेतकऱ्यांवर कारवाई करून प्रश्न सुटणार नाही. आम्हाला न्याय न मिळाल्यास आंदोलन आणखी उग्र व व्यापक करू, असा इशारा आंदोलकांनी दिला.प्रशासनाने तातडीने योग्य दाबाने पाणी सोडून संपूर्ण कालव्याची प्रत्यक्ष पाहणी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी,अशी मागणी शेतकऱ्यांनी केली.

या आंदोलनात अतुल ढवळे, अजित शेलार, परसराम परभाणे, शुभम ढवळे, वैभव ढवळे, संग्राम शेलार, रावसाहेब शेलार, कैलास भोसले, किरण शेलार, अमोल शेलार, बाळासाहेब ढवळे, सचिन ढवळे, शशिकांत शेलार, भानुदास बोत्रे आदी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### अधिकाऱ्यांची भूमिका

पोलीस प्रशासनाची मदत घेऊन पाणी चोरी करणाऱ्या शेतकऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्यात येईल. कोणालाही नियमबाह्य पाणी उपसा करू दिला जाणार नाही. तसेच शेवटच्या टोकावरील शेतकऱ्यांना उच्च दाबाने व नियमित पाणीपुरवठा मिळेल, अशी माहिती घोड धरणाचे कनिष्ठ अभियंता महेश शिंदे यांनी दिली.

# एमआयटी कॉर्नर येथे भरधाव पिकअप पलटी; दोन होमगार्ड जखमी

**लोणी काळभोर, ता. ५ :** पुणे- सोलापूर महामार्गावरील भरधाव वेगाने आलेली पिकअप गाडी अचानक ब्रेक मारल्याने पलटी होऊन कारला धडक दिल्याची घटना घडली. या अपघातात बंदोबस्तावर तैनात असलेले दोन होमगार्ड किरकोळ जखमी झाले आहेत. ही घटना कदमवाकवस्ती (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील एमआयटी कॉर्नर येथे मंगळवारी (ता. ) सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास घडली. संबंधित पिकअप चालकाविरुद्ध लोणी काळभोर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अनिल तानाजी बनकर (रा. मोरे वस्ती, तुपे पार्क, पुणे मूळ रा. वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर) असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या चालकाचे नाव आहे. याप्रकरणी पोलीस हवालदार सर्जेराव रामचंद्र दडस (वय ३७) यांनी सरकारच्या वतीने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, एमआयटी कॉर्नर येथे वाहतूक बंदोबस्तासाठी पोलीस कर्मचारी व होमगार्ड तैनात होते. सायंकाळी सुमारे साडेसहा वाजण्याच्या सुमारास महिंद्रा पिकअप ही गाडी सोलापूरकडून पुण्याकडे भरधाव वेगाने येत होती. चालकाने चौकात अचानक जोरात ब्रेक मारल्याने पिकअप गाडीवरील ताबा सुटला आणि गाडी पलटी झाली. त्यानंतर ती बंदोबस्ताच्या ठिकाणी येऊन रस्त्यावरून समोरून जाणाऱ्या कार ला पाठीमागून जोरात धडकली.

या धडक्त कारच्या मागील डाव्या बाजूचे मोठे नुकसान झाले. अपघाताच्या वेळी बंदोबस्तासाठी उपस्थित असलेले होमगार्ड अतुल कांरजकर यांच्या उजव्या हाताला तर विजय शिंदे यांच्या डाव्या हाताला किरकोळ दुखापत झाली. जखमींना तात्काळ खासगी रुग्णवाहिकेद्वारे उपचारासाठी रुग्णालयात हलविण्यात आले.

दरम्यान, पोलिसांनी पिकअप चालकाला ताब्यात घेतले असता त्याने आपले नाव अनिल तानाजी बनकर (रा. मोरे वस्ती, तुपे पार्क, पुणे मूळ रा. वेळापूर, ता. माळशिरस, जि. सोलापूर) असे सांगितले. त्यालाही वैद्यकीय तपासणीसाठी ससून रुग्णालयात पाठविण्यात आले. पिकअप चालकाने वाहतुकीचे नियम पाळले नाहीत आणि हयगयीने व बेदरकारपणे वाहन चालवून इतरांच्या जीवितास धोका निर्माण केल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे.

# बारामतीत पतीसमोरच पत्नी आणि मुलीचा जागीच मृत्यू

**पुणे, ता. ५ :** बारामतीपारवडी रस्त्यावर बुधवारी रात्री झालेल्या भीषण अपघातात आई आणि मुलीचा मृत्यू झाला असून पती आणि मुलगा गंभीर जखमी झाले आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, एका दुचाकीवरून एकाच कुटुंबातील ४ जण प्रवास करत होते. यात पती, पत्नी आणि त्यांची दोन लहान मुले यांचा समावेश होता. रात्रीच्या सुमारास बारामतीपारवडी रस्त्यावर त्यांच्या दुचाकीला समोरून येणाऱ्या भरधाव चारचाकी वाहनाने जोरदार धडक दिली. धडक इतकी तीव्र होती की दुचाकीचा मोठ्या प्रमाणात चुराडा झाला.

या अपघातात दुचाकीवरील महिलेचा आणि तिच्या लहान मुलीचा जागीच मृत्यू झाला. तर पती



आणि मुलगा गंभीर जखमी झाले. अपघातानंतर स्थानिक नागरिकांनी तातडीने मदत करत जखमींना जवळच्या रुग्णालयात दाखल केले. सध्या त्यांच्यावर उपचार सुरू असल्याची माहिती मिळत आहे.

अपघात इतका गंभीर होता की धडकेनंतर दुचाकी रस्त्याच्या कडेला दूर फेकली गेली. चारचाकी वाहनाचेही मोठे नुकसान झाले आहे. एकाच कुटुंबातील दोन जणांचा मृत्यू झाल्यामुळे पारवडी आणि बारामती परिसरात शोक व्यक्त केला जात आहे. या घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा केला. अपघाताचे नेमके कारण काय २याचा तपास पोलिसांकडून सुरू आहे. तसेच संबंधित वाहन चालकाबाबतही चौकशी सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे.

# डोर्लेवाडीत संत तुकाराम महाराज बीज उत्सव साजरा

**गोरख जाधव**

डोर्लेवाडी, ता. ५ : डोर्लेवाडी (ता. बारामती) येथे संत तुकाराम महाराज बीज उत्सव यंदा पारंपरिक पद्धतीने आणि भक्तिभावाने साजरा करण्यात आला. देहूनंतर डोर्लेवाडी येथे हा उत्सव मोठ्या प्रमाणावर होत असल्याने परिसरातील भाविकांची लक्षणीय उपस्थिती होती. पहाटेपासूनच अभंग, भजन, कीर्तन आणि हरिनाम सप्ताहामुळे गावात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले होते. मंदिर परिसरात आकर्षक सजावट करण्यात आली होती.

याची देही, याची डोळा हा सोहळा अनुभवण्यासाठी भाविकांनी मोठी गर्दी केली होती. मंदिर परिसरात सकाळपासून टाळ-मृदंगाच्या तालावर अखंड हरिनामाचा गजर सुरू होता.

आरती तुकारामा स्वामी
सद्गुरू धामा!!
सच्चिदानंद मूर्ती पाय दाखवी
आम्हा!!



राघवे सागरात पाषाण तारीले,
तैसे तुकोबाचे अभंग रक्षिले!!

या अभंगाने वातावरण भारावून गेले. दुपारी बारा वाजता पुंडलिक वरदा हरी विठ्ठलच्या जयघोषात भाविकांनी श्रींच्या मूर्तीवर गुलाल व पुष्पवृष्टी करून बीजेचा सोहळा साजरा केला.

देवस्थान समिती व सांप्रदायिक भजनी मंडळाच्या वतीने आठ दिवसांपासून कीर्तन महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. पहाटे मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली. महाभिषेकानंतर बाळासाहेब नाळे महाराज यांचे प्रवचन झाले. त्यानंतर लक्ष्मण महाराज कोकाटे यांनी बीज निमित्त फुलांचे कीर्तन सादर करत संत तुकाराम महाराजांच्या जीवनकार्याचा ऊहापोह केला. टाळ-मृदंगाच्या निनादात आणि हरिनामाच्या गजरात भाविकांनी दर्शन घेतले. गाथा पारायण आणि कीर्तन कार्यक्रमांना उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

दरम्यान, राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अपघाती निधनामुळे गावावर शोककळा पसरली होती. त्यांच्या स्मृतीप्रित्यर्थ उत्सव साधेपणाने साजरा करण्यात आला. दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून दोन मिनिटे मौन पाळण्यात आले.

शरद पवार गटाचे युवा नेते युगेंद्र पवार यांनीही सोहळ्यास उपस्थिती लावली. ते सुमारे तासभर कीर्तनात सहभागी झाले.

डोर्लेवाडीतील यात्रेला दरवर्षी पै-पाहुणे व माहेरवाशिणी मोठ्या संख्येने येतात. गावात हिंदू-मुस्लिम समाज एकत्र नांदत असल्याने यात्रेच्या निमित्ताने राष्ट्रीय एकात्मतेचे दर्शन घडते.

ग्रामपंचायतीच्या वतीने स्वच्छता, रस्ते दुरुस्ती व पिण्याच्या शुद्ध पाण्याची व्यवस्था करण्यात आली. बारामती शहर पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. प्राथमिक आरोग्य केंद्रातर्फे मोफत आरोग्य तपासणी व औषधोपचाराची सोय करण्यात आली. सामाजिक संस्था व स्थानिक पदाधिकाऱ्यांनी पाण्याचे मोफत वाटप केले.

उत्सवाच्या निमित्ताने गावात भक्ती आणि शोक अशा मिश्र भावना पाहायला मिळाल्या. परंपरा जपत आणि परिस्थितीचे भान ठेवत डोर्लेवाडीकरांनी बीज सोहळा शांततेत व शिस्तीत पार पाडला.

## संक्षिप्त

### एमआयटी कॉलेज कॅम्पसमध्ये मुलाला मारहाण

**पुणे, ता. ५ :** बापाचं काळीज लेकीसाठी किती हळवं असतं आणि तिच्यावर वेळ आली तर तो किती आक्रमक होऊ शकतो, याचा प्रत्यय लोणी काळभोर येथील एमआयटी महाविद्यालयात आला. गेल्या १५ दिवसांपासून लेकीला छळणाऱ्या टवाळखोर विद्यार्थ्याला तिच्या वडिलांनी भर कॅम्पसमध्ये गाठलं आणि त्याची चांगलीच कानउघडणी केली. संबंधित हुल्लडबाज विद्यार्थी पीडित तरुणीला गेल्या दोन आठवड्यांपासून ऑनलाईन माध्यमातून सतत त्रास देत होता. सुरुवातीला याकडे दुर्लक्ष करणाऱ्या तरुणीचा छळ जेव्हा मर्यादेबाहेर गेला, तेव्हा तिने धीर एकवटून ही बाब वडिलांना सांगितली. आपली मुलगी इतक्या मानसिक त्रासात आहे हे कळताच या बापाचा संयम सुटला. त्यांनी थेट महाविद्यालय गाठले आणि त्या तरुणाला जाब विचारला.वडिलांनी त्या मुलाला जाब विचारताच दोघांमध्ये जोरदार वाद झाला. मुलाची उद्दाम वृत्ती पाहून वडिलांचा संताप अनावर झाला. त्यांनी सर्वांसमोर त्या टवाळखोराला बेदम चोप दिला. पुन्हा माझ्या लेकीला त्रास दिला तर याद राख, अशा सज्जड दमही दिला.

### घरफोडीतीच्या गुन्ह्यातील आरोपीला अटक

**पुणे, ता. ५ :** घरफोडीच्या गुन्ह्यात मागील आठ महिन्यांपासून फरार असलेला आरोपी अखेर गुन्हे शाखेच्या युनिट ४ च्या पथकाने जेरबंद केला. ही कारवाई दि. ४ मार्च २०२६ रोजी करण्यात आली. युनिट ४ चे अधिकारी लक्ष्मीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत प्रतिबंधक गस्त घालत असताना नानापेठेतील दुर्गा निवास अपार्टमेंट येथे घरफोडी करणारा पार्थ भांडे हा येरवडा मेट्रो स्थानकाजवळ येणार असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली. त्यानुसार पथकाने सापळा रचून संबंधित इसमास ताब्यात घेतले. चौकशीत त्याने आपले नाव पार्थ ऊर्फ सागर ज्ञानेश्वर भांडे (वय ३१, रा. घोरपडी पेठ, पुणे) असे सांगितले. तपासात त्याने गुन्ह्याची कबुली दिली. समर्थ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून तो पाहिजे आरोपी असल्याचे स्पष्ट झाले. सदर आरोपीस पुढील कारवाईसाठी समर्थ पोलीस ठाण्याच्या ताब्यात देण्यात आले असून पुढील तपास सुरू आहे.

### पुणे विमानतळावर ७५ लाखांचे हायड्रोपोनिक गांजा जप्त

**पुणे, ता. ५ :** पुणे आंतरराष्ट्रीय विमानतळावर महसूल गुप्तचर विभागाच्या (एअर इंटेलिजन्स युनिट) अधिकाऱ्यांनी मोठी कारवाई करत सुमारे ७४.५० लाख रुपये किमतीचा 'हायड्रोपोनिक गांजा' (मारिजुआना) जप्त केला आहे. ही कारवाई ५ मार्च २०२६ रोजी करण्यात आली. अधिकाऱ्यांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, बँकॉकहून पुण्याकडे येणाऱ्या 'एअर इंडिया एक्सप्रेस'च्या विमानाची सखोल तपासणी करण्यात आली. या तपासणीदरम्यान विमानातील लॅव्हेटरीमधील (स्वच्छतागृह) 'टिश्यू कॅबिनेट'मध्ये दोन पिवळ्या रंगाचे फुड पॅकेट लपवलेले आढळून आले. पॅकेट उघडून पाहिले असता, त्यामध्ये एकूण ८ व्हॅक्युम सीलबंद पाकिटांत ७४५ ग्रॅम हायड्रोपोनिक गांजा सापडला. आंतरराष्ट्रीय अवैध बाजारपेठेत या अमली पदार्थाची किंमत सुमारे ७४.५० लाख रुपये असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. पुढील तपास सुरू सदर अमली पदार्थ एनडीपीएस कायदा १९८५ अंतर्गत जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणात अद्याप कोणालाही अटक करण्यात आलेली नाही. हा माल बँकॉकवरून कोणाकडून पाठवण्यात आला आणि पुण्यात तो कोणासाठी ठेवला होता, याचा पुढील तपास अधिकारी करत आहेत.

# शेतकऱ्यांच्या अतिक्रमण नोटीसांना विखे पाटलांकडून स्थगिती : हर्षवर्धन पाटील

**सागर जगदाळे**

भिगवण, ता. ५ : उजनी धरणाच्या पाणलोट क्षेत्रातील धरणग्रस्त शेतकऱ्यांना जलसंपदा विभागाने दिलेल्या अतिक्रमण हटाव नोटीसांना तात्काळ स्थगिती देण्याचा व या गाळपेर जमिनी धरणग्रस्त शेतकऱ्यांना कराराने भाडेपट्ट्यावर देण्याचा निर्णय जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतला आहे. जलसंपदा मंत्र्यांकडून उजनी पाणलोट क्षेत्रातील संबंधित बहुतांश प्रश्न हे सांघिक प्रयत्नांमुळे मार्गी लागले असल्याने धरणग्रस्त शेतकऱ्यांनी घाबरून जाण्याचे कारण नाही, अशी माहिती माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी जलसंपदा मंत्र्यांच्या बैठकीनंतर बुधवारी (दि. ४) दिली.

तसेच यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी जलसंपदा मंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांचे धरणग्रस्त शेतकऱ्यांच्या वतीने आभार व्यक्त केले.

उजनी धरणग्रस्तांच्या विविध मागण्यांचे निवेदन जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना कृषिमंत्री दत्तात्रय भरणे व माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांनी मुंबईत भेट घेऊन नुकतेच बुधवारी (दि. २५ फेब्रु.) दिले होते. त्यानुसार आज बुधवारी (दि. ४ मार्च) मुंबईत ना. राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासमवेत झालेल्या बैठकीतील निर्णयांची सविस्तर माहिती हर्षवर्धन पाटील यांनी दिली. या बैठकीस कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, माजी मंत्री सदाभाऊ खोत आदी मान्यवर उपस्थित होते.



हर्षवर्धन पाटील पुढे म्हणाले, उजनी पाणलोट क्षेत्रातील इंदापूर, दौंड, कर्जत, करमाळा, माढा या तालुक्यातील सुमारे १३ हजार हेक्टर संपादित व वहिवाट असलेली गाळपेर जमीन जाहीर प्रकटन करून धरणग्रस्त, प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना ११/११ महिन्यांच्या कराराने, १२ वर्षांच्या भाडेपट्ट्यावर देण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला आहे.

उजनी धरणाला लागून मोठी भिंत आहे. तिथे फ्लोटिंग (तरंगता) सोलर पॉवर एनर्जी प्रकल्प नियोजित आहे. मात्र या प्रकल्पाची सविस्तर माहिती शेतकऱ्यांना देऊन व शेतकऱ्यांना विश्वासात घेऊनच या प्रकल्पाबाबत पुढील निर्णय घेण्याचे ठरले आहे. तसेच उजनी धरणालगत ३५० हेक्टर जमीन आहे. याठिकाणी पर्यटन केंद्र प्रस्तावित आहे. मात्र सध्या तेथे ६० ते ७० हेक्टर जमीन शेतकरी वहिवाटत आहेत. तसेच उजनी गावठाण येथेही २५० ते ३०० हेक्टर जमीन असून तेथेही पर्यटन केंद्र प्रस्तावित आहे. तिथेही शेतकरी जमीन वहिवाटत आहेत. या दोन्ही ठिकाणी शेतकऱ्यांवर अन्याय होऊ देणार नाही. या दोन्ही ठिकाणांचा सविस्तर अहवाल तयार होईपर्यंत पुढील कार्यवाही करण्यात येऊ नये, असा धरणग्रस्त शेतकऱ्यांना दिलासादायक निर्णय बैठकीत जलसंपदा मंत्री ना. विखे पाटील यांनी घेतल्याचे हर्षवर्धन पाटील यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले, उजनीची कॉलनी (वसाहत) आहे, तिथे लोक राहतात. मग आता हा सगळा प्रकल्प झाल्यानंतर एकतर रांझणी किंवा उजनी गाव यामध्ये वर्ग करावे किंवा त्याला स्वतंत्र गावठाण करावे आणि स्वतंत्र महसूल सजा करावी, या संदर्भातही बैठकीत चर्चा झाली. तसेच अधिवेशन संपल्यानंतर पुणे येथे कृष्णा खोरे महामंडळाच्या कार्यालयात धरणग्रस्त शेतकऱ्यांसमवेत सविस्तर बैठक घेण्याचे आजच्या बैठकीत ठरले आहे. उजनी पाणलोट क्षेत्रातील धरणग्रस्त शेतकऱ्यांवर अन्याय होणार नाही, असा विश्वासही यावेळी हर्षवर्धन पाटील यांनी व्यक्त केला.

# इराणी विद्यार्थ्यांसमोरच्या संकटावर पुणे पोलिसांचा मोठा तोडगा

**पुणे, ता. ५ :** अमेरिका, इस्त्रायल आणि इराण यांच्यात सुरू असलेल्या तणावाच्या पार्श्वभूमीवर पुणे शहरातील सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करण्यात आली आहे. कोणताही अनुचित प्रकार घडू नये यासाठी पोलिसांनी खबरदारीचा उपाय म्हणून शहरभर गस्त वाढवली आहे. सह पोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी याबाबत माहिती देताना नागरिकांनी अफवांवर विश्वास ठेवू नये, असे आवाहन केले आहे.

शहरातील धार्मिक स्थळे, प्रमुख चौक, बाजारपेठा, मॉल्स, बसस्थानके आणि रेल्वे स्थानके या ठिकाणी अतिरिक्त बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. संवेदनशील भागांमध्ये पायी गस्त वाढवण्यात आली असून सीसीटीव्ही यंत्रणेद्वारे देखरेख अधिक



मजबूत करण्यात आली आहे. कायदा आणि सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी प्रशासन सतर्क असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.

नागरिकांनी कोणतीही संशयास्पद हालचाल दिसल्यास त्वरित पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. यासाठी ११२ हा आपत्कालीन क्रमांक उपलब्ध आहे. तसेच जवळच्या पोलीस ठाण्याशी संपर्क साधण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, पुण्यात सध्या सुमारे १२० ते १२५ इराणी नागरिक वास्तव्यास असल्याची माहिती विशेष शाखेकडून देण्यात आली. यामध्ये विद्यार्थी, व्यावसायिक आणि वैद्यकीय कारणांसाठी आलेल्या नागरिकांचा समावेश आहे. सुमारे ३० इराणी महिला विवाहानंतर येथे स्थायिक झाल्या आहेत, तर जवळपास ६० विद्यार्थी विविध महाविद्यालयांत शिक्षण घेत आहेत. ज्यांच्या व्हिसाची मुदत संपत आहे, त्यांना नियमांनुसार मदत केली जाणार असल्याचेही पोलिसांनी सांगितले. वाढीव सुरक्षा ही केवळ खबरदारी म्हणून करण्यात आली असून कोणत्याही समुदायाला लक्ष्य केलेले नाही, असे प्रशासनाने स्पष्ट केले.

# 'बोगस' दिव्यांगांवर आता कारवाईची टांगती तलवार

**मुंबई, ता. ५ :** बोगस प्रमाणपत्रे सादर करून शासकीय नोकरी करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे धाबे दणदणाले आहेत. राज्यातील जिल्हा परिषदांमध्ये कार्यरत असलेल्या दिव्यांगांच्या प्रमाणपत्रांची कसून पडताळणी सुरू असून, आतापर्यंत ३१६ अधिकारी आणि कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. ४० टक्क्यांहून कमी दिव्यांगत्व असूनही आरक्षणाचा लाभ घेणाऱ्या अधिकाऱ्यांची चौकशी केली जात आहे.

राज्यातील २८ जिल्हा परिषदांमध्ये एकूण १०,९२२ कर्मचारी दिव्यांग कोट्यातून कार्यरत आहेत. या सर्वांच्या प्रमाणपत्रांची सत्यता तपासण्याचे आदेश दिव्यांग कल्याण विभागाचे सचिव तुकाराम मुंढे यांनी दिले होते. दरम्यान, याप्रकरणी आतापर्यंत ६,२१८ कर्मचाऱ्यांची



तपासणी पूर्ण झाली आहे. यातील ५ टक्क्यांहून अधिक कर्मचारी दोषी आढळल्याने खळबळ उडाली आहे.

अनेकांनी बनावट कागदपत्रे जोडली होती, तर काहींनी नियमानुसार किमान ४० टक्के दिव्यांगत्व नसतानाही वशिलेबाजीने प्रमाणपत्रे मिळवली होती. मंत्री अतुल सावे यांनी ही धक्कादायक माहिती विधान परिषदेत दिली. विशेष म्हणजे, अद्याप जवळपास ५००० कर्मचाऱ्यांची पडताळणी बाकी आहे, ज्यामुळे कारवाईचा हा आकडा आणखी वाढण्याची दाट शक्यता आहे.

# गुंतवणुकीचे आमिष दाखवून दाम्पत्याला ३ कोटी ७८ लाखांचा गंडा

**लोणी काळभोर, ता. ५ :** पुणे मेट्रो प्रकल्पासाठी सिमेंट व स्टील पुरवठा करण्याच्या नावाखाली मोठा नफा मिळेल असे आमिष दाखवत एका दाम्पत्याची तब्बल ३ कोटी ७८ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात दोघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

संतोष सुरेश काकडे (रा. राहींजवस्ती, लोणी काळभोर, ता. हवेली) आणि अतुल पवार अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी प्रिती विनोद जैन (वय ४२, व्यवसाय नोकरी, रा. कृषीतंत्र विद्यालय, मांजरी फार्म, मांजरी बु.) यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, प्रिती जैन या सन २०१९ पासून कृषितंत्र विद्यालय, मांजरी येथे कृषी सहाय्यक म्हणून कार्यरत आहेत. त्यांचे पती विनोद जैन यांची मावळ तालुक्यात वडिलोपार्जित शेती आहे. कोविड काळात प्रिती जैन यांना नोकरीनिमित्त मांजरी येथे ये-जा करावी लागत असल्याने त्यांचे पतीही त्यांच्यासोबत येत असत. याच काळात विनोद जैन यांची ओळख अतुल पवार याच्याशी झाली.पवारचा पुणे सोलापूर महामार्गावरील मांजरी येथे बिल्डिंग मटेरियल पुरवठ्याचा व्यवसाय होता. दुकानात येणाऱ्या-जाणाऱ्या व्यावसायिकांमध्ये संतोष काकडे याचीही ओळख झाली. काकडे हा बिल्डिंग मटेरियल पुरवठादार असल्याचे सांगत होता.

एके दिवशी दुकानात चर्चा सुरू असताना संतोष काकडे याने आपण पुणे मेट्रो प्रकल्पासाठी सिमेंट व स्टीलचा पुरवठा करीत असल्याचे सांगितले. या कामासाठी मोठ्या प्रमाणावर भांडवलाची गरज असून गुंतवणूक केल्यास मोठा नफा मिळेल, असे आमिष विनोद जैन यांना दाखवले. या चर्चेनंतर अतुल पवार याने जैन यांना गुंतवणूक करण्याचा सल्ला दिला. सुरुवातीला जैन दाम्पत्याने सावध भूमिका घेतली होती.

# रांजणगाव येथे ठिबक संच चोरणारी टोळी सक्रिय

**पोपट पाचंगे**

रांजणगाव गणपती, ता. ५ : आधीच आर्थिक अडचणीत सापडलेल्या शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांपुढे आता नवे संकट उभे ठाकले आहे. तालुक्यातील रांजणगाव गणपती, खंडाळे व पिंपरी दुमाला परिसरातील शेतांमधून पिकांसाठी ठेवलेले ठिबक सिंचनाचे साहित्य आणि पाईप अज्ञात चोरट्यांनी लंपास केल्याची घटना उघडकीस आली आहे. याबाबत शेतकऱ्यांनी रांजणगाव एमआयडीसी पोलिसांना तक्रारी अर्ज दिला आहे.

स्थानिक शेतकऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, काही शेतकऱ्यांनी उन्हाळी हंगामातील पिकांसाठी मोठ्या खर्चातून ठिबक सिंचन यंत्रणा बसवली होती. मात्र, रात्रीच्या सुमारास अज्ञात चोरट्यांनी शेतात




प्रवेश करून पाईप कापून नेल्याचे दिसून आले. सकाळी शेतात गेल्यावर शेतकरी अजित खेडकर, गहिनीनाथ नरवडे, भानुदास खेडकर, संकेत नरवडे, कैलास नरवडे व भाऊसाहेब नरवडे यांच्या ही बाब निदर्शनास आली.

या चोरीमुळे शेतकऱ्यांचे हजारो रुपयांचे नुकसान झाले आहे. खत, बियाणे व मजुरीच्या वाढत्या खर्चामुळे आधीच त्रस्त असलेल्या शेतकऱ्यांमध्ये या प्रकारामुळे तीव्र संताप व्यक्त केला जात आहे. ठिबक सिंचन व्यवस्था पुन्हा उभारण्यासाठी आता पुन्हा मोठा खर्च करावा लागणार असल्याने शेतकरी चिंतेत आहेत. परिसरात यापूर्वीही शेती साहित्याच्या चोरीच्या अनेक घटना घडल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे पोलिसांनी तातडीने तपास करून आरोपींना अटक करावी, तसेच ग्रामीण भागात रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी शेतकऱ्यांकडून करण्यात येत आहे.

# शेतकऱ्यांची ३० जूनपर्यंत कर्जमाफी होणार : कृषीमंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई, ता. ५ :** राज्यातील शेतकरी कर्जमाफीच्या मुद्द्यावर सरकारने महत्त्वाची पावले उचलली आहेत. वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी प्रवीण परदेशी यांच्या अध्यक्षतेखाली उच्चस्तरीय समिती स्थापन करण्यात आली असून ही समिती कर्जमाफीसंदर्भात सविस्तर अहवाल तयार करणार आहे. हा अहवाल एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात सादर होण्याची शक्यता आहे. त्यानंतर ३० जूनपूर्वी अंतिम निर्णय जाहीर केला जाईल, अशी माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी विधान परिषदेत दिली.

सरकार शेतकऱ्यांच्या हितासाठी सकारात्मक भूमिका घेत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. समिती राज्यातील कर्जबाजारी शेतकऱ्यांची स्थिती, कर्जाचे स्वरूप, बँकांचा सहभाग आणि आर्थिक परिणाम



यांचा अभ्यास करत आहे. अहवालाच्या आधारे योग्य आणि टिकणारा निर्णय घेतला जाईल, असे त्यांनी सांगितले. या विषयावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्याशी चर्चा सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले.

दरम्यान, बदलते हवामान, अवकाळी पाऊस, दुष्काळ आणि कीड-रोग यामुळे शेती अधिक जोखमीची झाली आहे. उत्पादन खर्च वाढत असताना बाजारभाव स्थिर नसल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे केवळ कर्जमाफी नव्हे तर दीर्घकालीन उपायांची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

माय अ‍ॅग्री या कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित धोरणाद्वारे शेतकऱ्यांना हवामान अंदाज, कीड-रोग सूचना आणि बाजारभावाची माहिती दिली जाणार आहे. तसेच प्रधानमंत्री पीक विमा योजनेत गेल्या ९ वर्षांत सुमारे ३७,५०० कोटी रुपयांची नुकसानभरपाई देण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.

# पुणे–लोणावळा लोकलच्या फेऱ्या वाढणार

**पुणे, ता. ५ :** पुणेलोणावळा उपनगरी रेल्वेमार्गावर वाढत्या प्रवासी संख्येमुळे तिसरी आणि चौथी मार्गिका उभारण्याच्या प्रकल्पाला राज्य सरकारने गती देण्याचा निर्णय घेतला आहे. लोकल आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांमुळे होणारी गर्दी कमी करण्यासाठी हा प्रकल्प महत्त्वाचा मानला जात आहे. या कामासाठी राज्य सरकारच्या वाट्याचा ७६५ कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला असून त्यामुळे प्रकल्पाच्या कामाला वेग मिळण्याची शक्यता आहे.

राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत या प्रकल्पाला यापूर्वीच मंजुरी देण्यात आली होती. त्यानंतर ११ सप्टेंबर २०२५ रोजी शासन निर्णय जारी करण्यात आला. या निर्णयानुसार निधी वितरणाची प्रक्रिया पूर्ण करण्यात आली असून हा निधी मुंबई रेल्वे विकास महामंडळाकडे वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली आहे. तसेच या प्रकल्पासाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्यासही सरकारने



परवानगी दिली आहे.

पुणे ते लोणावळा या रेल्वेमार्गाची एकूण लांबी सुमारे ६३.८७ किलोमीटर आहे. या मार्गावर १७ स्थानके असून दररोज हजारो नोकरदार, विद्यार्थी आणि व्यावसायिक प्रवास करतात. सध्या लोकल आणि एक्सप्रेस गाड्या एकाच मार्गिकेवरून धावत असल्याने वेळापत्रकात अनेकदा विलंब होतो. नवीन मार्गिका सुरू झाल्यानंतर लोकल आणि लांब पल्ल्याच्या गाड्यांचे मार्ग वेगळे होणार असल्याने प्रवास अधिक सुरळीत होण्याची अपेक्षा आहे.

या प्रकल्पाचा एकूण खर्च सुमारे ५१०० कोटी रुपये आहे. त्यातील ३० टक्के म्हणजेच ७६५ कोटी रुपये राज्य सरकार देत आहे. उर्वरित निधी केंद्र सरकार आणि रेल्वे प्रशासनाकडून उपलब्ध होणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर लोकल फेऱ्यांमध्ये वाढ होऊन प्रवाशांना अधिक जलद आणि सोयीस्कर सेवा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पुणे – अहिल्यानगर महामार्गावर दररोजच वाहतूक कोंडी, प्रवाशांसह स्थानिक नागरिक त्रस्त

**पोपट पाचंगे**

रांजणगाव गणपती, ता. ५ : पुणे - अहिल्यानगर महामार्गावर दिवसेंदिवस होत असलेल्या वाहतूक कोंडीमुळे नागरिक अक्षरशः हैराण झाले असून, रोजच्या वाहतूककोंडीच्या समस्येमुळे मानसिक त्रास सहन करण्याची वेळ स्थानिकांवर आली आहे.

या महामार्गावर झपाट्याने वाढलेले औद्योगिकीकरण, वाढती लोकसंख्या आणि अपुरी रस्ते व्यवस्था यामुळे परिसरातील वाहतूक व्यवस्थेचा पूर्णपणे बोजवारा उडाल्याचे चित्र दिसत आहे.

औद्योगिक वसाहतीमुळे मोठ्या प्रमाणात अवजड



वाहनांची ये-जा वाढली आहे. मात्र त्यानुसार रस्त्यांचे रुंदीकरण, पर्यायी मार्ग किंवा ट्रॉफिक नियोजन करण्यात प्रशासनाकडून ठोस उपाययोजना झालेल्या नाहीत. परिणामी सकाळ व संध्याकाळच्या वेळी मुख्य मार्गांवर मोठ्या प्रमाणात वाहनांच्या रांगा लागतात. एमआयडीसीतील कंपन्यांमध्ये कामावर जाण्यासाठी शासकीय अधिकारी व कर्मचारी वर्ग तसेच कामगारांना दररोज घरातून लवकर निघावे लागत आहे. रुग्णालयात जाणाऱ्या रुग्णांना तसेच शालेय विद्यार्थ्यांना देखील प्रचंड मनस्ताप सहन करावा लागत आहे. वाहतूक कोंडीमुळे प्रवासाचा वेळ दुप्पट होत असल्याने नागरिकांमध्ये संतापाची भावना वाढताना दिसत आहे.

स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी अनेक वेळा प्रशासनाकडे निवेदने व पत्रव्यवहार करूनही केवळ आश्वासनांवर हा महत्त्वाचा प्रश्न अडकून राहिल्याचा

### नागरिकांच्या प्रमुख मागण्या

- पुणे-अहिल्यानगर महामार्ग या मुख्य रस्त्यावरील शिरूर ते शिक्रापूर या रस्त्याचे तातडीने रुंदीकरण
- अवजड वाहनांसाठी स्वतंत्र मार्गाची निर्मिती
- ट्रॉफिक पोलिसांची कायमस्वरूपी नियुक्ती
- औद्योगिक वसाहतीसाठी पर्यायी बायपास रस्ता
- सिग्नल व्यवस्था व वाहतूक नियोजन त्वरित लागू करणे

आरोप नागरिकांकडून केला जात आहे. कागदोपत्री निर्णय होत असले तरी प्रत्यक्षात परिस्थितीत कोणताही बदल दिसत नसल्याची खंत व्यक्त होत आहे.

दरम्यान, वाढत्या वाहतुकीच्या समस्येमुळे औद्योगिक विकासावरही परिणाम होत असल्याची चर्चा सुरू आहे. भविष्यात नवीन उद्योग येण्यास अडथळे निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात असून, विद्यमान उद्योग स्थलांतरित झाल्यास स्थानिक रोजगार, हॉटेल व्यवसाय, फेरीवाले व छोट्या दुकानदारांवर मोठा आर्थिक परिणाम होऊ शकतो. नागरिकांनी प्रशासनाने तातडीने वाहतूक नियोजन, रस्त्यांचे रुंदीकरण व कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी मागणी स्थानिक नागरिकांसह वाहन चालकांनी केली आहे.

पुणे प्राईम न्यूज
जनमानसाचा निडर आवाज...
http://www.puneprimenews.com

# लोणी काळभोरमध्ये कचऱ्यावरून एमआयटी विरुद्ध गाव थेट संघर्ष

## धुराने विद्यार्थी हैराण, कचऱ्याने गावकरी त्रस्त

> कचऱ्याच्या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्याचा निर्णय घेतला आहे. मात्र, शासनाचा जी.आर. असतानाही एमआयटी प्रशासनाने पानंद व वाहिवाटीचे रस्ते अडवून कचऱ्याच्या गाड्यांना प्रवेश नाकारला आहे. त्यामुळे गावभर कचऱ्याचे ढीग साचून परिस्थिती गंभीर झाली आहे. याबाबत गावकऱ्यांची बैठक घेणार आहे. गाव जे ठरवेल, तोच निर्णय आम्ही ठामपणे अमलात आणू. कचऱ्यामुळे गावात रोगराई पसरली तर त्याची जबाबदारी कोण घेणार?एमआयटी प्रशासनाने ही भूमिका तातडीने बदलली नाही तर गावकऱ्यांना कठोर भूमिका घ्यावी लागेल.
> - नागेश काळभोर, (प्रशासन, लोणी काळभोर, ता. हवेली)

> कचऱ्याच्या प्रश्नासाठी आम्ही २०१८ पासून सातत्याने पाठपुरावा करत आहोत. मात्र, पीएमआरडीएचा डीपी मंजूर न झाल्यामुळे कचरा प्रकल्पासाठी जागेचा प्रश्न अजूनही प्रलंबित आहे. जागा निश्चित होताच कंपन्या सीएसआर फंडातून निधी देण्यास तयार आहेत. विद्यार्थ्यांचे आरोग्य जितकेमहत्त्वाचे आहे, तितकेच गावकऱ्यांचेही आहे. त्यामुळे एमआयटी प्रशासनाने सामंजस्याची भूमिका घ्यावी आणि शासनाकडून जागा उपलब्ध होईपर्यंत कचऱ्याच्या गाड्या अडवू नयेत. जागा मिळाल्यानंतर सहा महिन्यांत कचऱ्याचा प्रश्न मार्गी लागला नाही, तर त्यांनी पुढील काळात निर्णय घ्यावा. परंतु, सध्या कचऱ्याचे संकट सोडविण्यासाठी लवकरच सर्वपक्षीय बैठक बोलावून ठोस निर्णय घेतला जाईल.
> - **चित्तरंजन गायकवाड,** (माजी सरपंच, कदमवाकवस्ती, ता. हवेली)

**विशाल कदम**

लोणी काळभोर, ता. ५: लोणी काळभोर परिसरात कचऱ्याचा प्रश्न अक्षरशः स्'ोटक बनला असून आता तो थेट एमआयटी प्रशासन विरुद्ध गावकरी अशा उघड संघर्षात बदलला आहे. एकीकडे नदीपात्रात टाकलेल्या कचऱ्याला लागलेल्या आगीमुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले, तर दुसरीकडे एमआयटीने कचऱ्याच्या गाड्यांना बंदी घातल्यानंतर गावात कचऱ्याचे ढीग साचल्याने नागरिक त्रस्त झाले आहेत. या सगळ्या गोंधळात हजारो नागरिक आणि विद्यार्थ्यांचे आरोग्य टांगणीला लागले असून प्रशासन मात्र हातावर हात धरून बसल्याचा आरोप होत आहे.

लोणी काळभोर येथील मुळा-मुठा नदीपात्रात टाकलेल्या कचऱ्याला शुक्रवारी (ता. २७ ेबुवारी) सकाळी साडेनऊच्या सुमारास अचानक आग लागली होती. सुरुवातीला छोटी वाटणारी ही आग चार दिवस सतत धुमसत राहिली. या आगीतून निघणारे काळेकुट्ट धुराचे लोट परिसरात पसरल्याने संपूर्ण भागात विषारी वातावरण निर्माण झाले होते. या धुराचा सर्वाधिक 'टका जवळच असलेल्या एमआयटी शैक्षणिक संकुलातील वसतिगृहांतील विद्यार्थ्यांना बसला. अनेक विद्यार्थ्यांना श्वास घेण्यास त्रास, डोकेदुखी आणि मळमळ



अशा तक्रारी जाणवू लागल्या. काही विद्यार्थ्यांची तब्येत बिघडल्याने त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल करावे लागले.

या प्रकारानंतर संतप्त झालेल्या एमआयटीमधील हजारो विद्यार्थ्यांनी बुधवारी (ता. ४ मार्च) एकत्र येत कचरा बंद आंदोलन छेडले. विद्यार्थ्यांच्या तीव्र दबावानंतर एमआयटी प्रशासनाने कठोर भूमिका घेत कदमवाकवस्ती आणि लोणी काळभोर ग्रामपंचायतींच्या कचरा वाहून नेणाऱ्या गाड्यांना विद्यापीठाच्या परिसरातून नदीकडे जाण्यास पूर्ण बंदी घातली. मात्र या निर्णयामुळे नवीनच संकट उभे राहिले आहे. कचऱ्याच्या गाड्यांना मार्ग बंद झाल्याने लोणी काळभोर आणि कदमवाकवस्ती या दोन्ही गावांमध्ये कचऱ्याचे ढीग रस्त्यांवर आणि मोकळ्या जागांवर साचू लागले आहेत. दुर्गंधीमुळे नागरिकांचे जगणे अक्षरशः असह्य झाले असून डास-माशांचा प्रादुर्भाव वाढू लागला आहे. त्यामुळे परिसरात रोगराई पसरू शकते, अशी भीती व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, गावकरी आणि एमआयटी प्रशासन एकमेकांवर जबाबदारी ढकलत असल्याचे चित्र दिसत आहे. विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न पुढे करून एमआयटी प्रशासन कचरा थांबवण्याच्या भूमिकेवर ठाम आहे, तर गावातील लोकप्रतिनिधी आणि ग्रामपंचायती कचरा टाकण्यासाठी पर्यायी व्यवस्था नसताना अचानक बंदी घालणे अन्यायकारकअसल्याचा आरोप करत आहेत. या संघर्षात सर्वात मोठे नुकसान मात्र सामान्य नागरिक आणि विद्यार्थ्यांचे होत आहे. नदीपात्रात कचरा टाकला तर २० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात येते, आणि गावात कचरा साचला तर हजारो नागरिकांच्या आरोग्याला धोका आहे.

### संघर्ष भडकण्याची शक्यता

स्थानिक प्रशासनाने अद्याप ठोस निर्णय घेतलेला नसल्याने परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. पर्यावरण, आरोग्य आणि सार्वजनिक स्वच्छतेचा प्रश्न इतका तीव्र झालेला असताना प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून कचरा व्यवस्थापनाचा कायम स्वरूपी मार्ग काढणे अत्यावश्यक झाले आहे. अन्यथा हा संघर्ष आणखी भडकण्याची चिन्हे स्पष्टपणे दिसू लागली आहेत.

# तेरा वर्षानंतरही सनमच्या मृत्यूचे गूढ अद्यापही कायम

**पुणे, ता. ५ :** देशातील गाजलेल्या आणि रहस्यमय गुन्हेगारी प्रकरणांमध्ये सनम हसन प्रकरणाचा अनेकदा उल्लेख केला जातो. १९ वर्षांच्या एका तरुणीचा वाढदिवसाच्या रात्री अचानक मृत्यू झाला आणि त्यानंतर सुरू झालेल्या तपासामुळे अनेक प्रश्न निर्माण झाले. या प्रकरणातील काही तपशील समोर आल्यानंतर तपास यंत्रणांनाही मोठे आव्हान उभे राहिले.



सनम हसन ही मूळची मुंबईची असून ती पुण्यात फॅशन डिझाईनिंगचे शिक्षण घेत होती. ३ ऑक्टोबर २०१२ रोजी तिचा वाढदिवस होता. त्या निमित्ताने मित्रांसोबत पुण्यातील एका अपार्टमेंटमध्ये छोटेखानी पार्टी आयोजित करण्यात आली होती. मात्र दुसऱ्या दिवशी पहाटे तिची तब्येत बिघडल्याची माहिती कुटुंबीयांना देण्यात आली. पालक पुण्यात पोहोचेपर्यंत सनमचा मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले.

सनमच्या मृत्यूनंतर तिच्या शरीरावर आढळलेले सीमेनचे नमुने आणि चार इंजेक्शनच्या खुणांमुळे, तिच्यावर लैंगिक अत्याचार करून हत्या करण्यात आल्याचा दाट संशय व्यक्त झाला. या प्रकरणाच्या तपासासाठी त्या रात्री पार्टीत उपस्थित असलेल्या जणांची डीएनए चाचणी करण्यात आली; मात्र धक्कादायक बाब म्हणजे, कोणाचेही नमुने मॅच झाले नाहीत.

तपासादरम्यान असाही दावा करण्यात आला की, ससून रुग्णालयातील कर्मचाऱ्यांच्या निष्काळजीपणामुळे किंवा जाणीवपूर्वक केलेल्या कृत्यामुळे फॉरेन्सिक नमुन्यांमधील 'हृदयांची' अदलाबदल झाली असावी. परिणामी, पुरावा म्हणून सादर करण्यात आलेले ते हृदय नेमकेकोणाचे होते, याचे गूढ आजही कायम असून या प्रकरणातील तपासावर प्रश्नचिन्ह उभे राहिले आहे.

नंतर तपासात काही वैद्यकीय प्रक्रियांमधील गोंधळामुळे काही नमुन्यांबाबत संभ्रम निर्माण झाल्याची शक्यता व्यक्त करण्यात आली. २०१४ मध्ये हे प्रकरण केंद्रीय तपास संस्थेकडे सोपवण्यात आले. २०१६ मध्ये पुढील तपासासाठी मृतदेह पुन्हा बाहेर काढून तपासणीही करण्यात आली. मात्र पुरावे अपुरे असल्याने या प्रकरणातील अनेक प्रश्न आजही अनुत्तरितच आहेत. सनम हसनचा मृत्यू नेमका कशामुळे झाला, याबाबत अजूनही स्पष्ट निष्कर्ष समोर आलेला नाही.

# सनी गँगचे दोन गुन्हेगारांना अटक; ६२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त

**अमित मुंडीक**

पुणे, ता. ५ : विश्रामबाग पोलीस ठाण्यात नोंद झालेल्या घरफोडी प्रकरणाचा तपास करताना पोलिसांनी सहा घरफोड्यांचा उलगडा केला असून सनी गँगशी संबंधित दोन आरोपींना अटक केली आहे. या कारवाईत सुमारे ६२ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस उपायुक्त कृषिकेश रावले यांनी दिलेल्या माहितीनुसार, १८ जानेवारी रोजी विश्रामबाग पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा तपास करण्यासाठी विशेष पथक नेमण्यात आले. पथकाने अनेक सीसीटीव्ही चित्रफिती आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपींची




ओळख पटवली. फेब्रुवारी महिन्यात आरोपी पुण्याकडे येत असल्याची माहिती मिळाल्यानंतर सापळा रचून २३ फेब्रुवारी रोजी त्यांना ताब्यात घेण्यात आले.

अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आकाश सुभाष (वय २३) आणि जितेंद्र चतुर्वेदी (वय ३२) अशी असून ते दिल्ली येथील रहिवासी आहेत. तपासादरम्यान ते ज्या निवासगृहात थांबले होते, तेथून ३२ तोळे सोने आणि १२५ ग्रॅम चांदी जप्त करण्यात आली. तसेच त्यांनी चोरी केलेला काही मुद्देमाल दिल्लीतील सोनाराकडे ठेवला असल्याचे उघड झाले असून तोही जप्त करण्यात आला आहे.

या आरोपींवर दिल्ली आणि उत्तर प्रदेशमध्ये खून, खुनाचा प्रयत्न तसेच गुन्हेगारी टोळीविरोधी कायद्यांतर्गत अनेक गुन्हे नोंद असल्याची माहिती पोलिसांनी दिली. या प्रकरणात विश्रामबाग, समर्थ, खडक आणि भोसरी पोलीस ठाण्यांतील घरफोडीच्या गुन्ह्यांचा समावेश आहे. चोरीचा माल खरेदी करणाऱ्या सोनारांवरही पुढील कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

# विद्या प्रतिष्ठानच्या प्रा. डॉ. सुनील ओगले व प्रा. डॉ. संजय खिलारे यांना राज्यस्तरीय पुरस्कार

**गोरख जाधव**

डोर्लेवाडी, ता. ५ : बारामती येथील विद्या प्रतिष्ठानच्या कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयातील प्रा. डॉ. सुनील ओगले आणि प्रा. डॉ. संजय खिलारे यांना महाराष्ट्र राज्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग तसेच महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्र यांच्या करिअर कट्टा उपक्रमांतर्गत महाविद्यालयीन स्पर्धा २०२५-२६ मध्ये राज्यस्तरीय पुरस्कारांनी गौरविण्यात आले. मुंबई येथील यशवंतराव चव्हाण सेंटर येथे उद्योगमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली आणि महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळाचे अध्यक्ष रविंद्र साठे यांच्या प्रमुख उपस्थितीत पुरस्कार वितरण सोहळा पार पडला.

या कार्यक्रमात महाविद्यालयाचे करिअर कट्टा समन्वयक प्रा. डॉ. सुनील ओगले यांना राज्यस्तरीय विशेष गौरव पुरस्कार, तर जिल्हा समन्वयक प्रा. डॉ. संजय खिलारे यांना उत्कृष्ट विभागीय समन्वयक पुरस्कार प्रदान करण्यात आला.

महाविद्यालयीन युवकांना करिअरविषयक योग्य दिशा देण्याच्या उद्देशाने करिअर कट्टा हा उपक्रम राज्यभर राबविला जात आहे. या उपक्रमांतर्गत विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयातील गेल्या पाच वर्षांत ४०० हून अधिक विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनासाठी सेंटर ऑफ एक्सलन्ससाठी करिअर कट्टामार्फत दरवर्षी दीड लाख रुपयांचे अनुदान दिले जाते. तसेच उद्योजकता विकास



केंद्राच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत, रोजगाराभिमुख योजना आणि ऑनलाइन शिक्षणाचे विविध प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यात येतात.


महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. भरत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सातत्याने प्रयत्न करणाऱ्या या दोन्ही प्राध्यापकांच्या कार्याचा राज्यस्तरावर गौरव करण्यात आल्याने महाविद्यालयाच्या शैक्षणिक कार्याला मोठी दाद मिळाली आहे.

पुरस्कार सोहळ्यास सोलर एनर्जी सोसायटी ऑफ इंडियाचे अध्यक्ष प्रफुल्ल पाठक, महाराष्ट्र आर्थिक विकास मंडळाचे क्षेत्रीय संचालक सचिन ईटकर, करिअर कट्टाचे अध्यक्ष यशवंत शितोळे, सोनाली लोहार, मिथीला दळवी तसेच आर्थिक साक्षरता केंद्राच्या तज्ज्ञ मार्गदर्शक डिंपल मित्तल आदी मान्यवर उपस्थित होते.

दरम्यान, पुणे येथे पार पडलेल्या विभागीय पुरस्कार सोहळ्यात महाविद्यालयातील करिअर संसदेने द्वितीय क्रमांक पटकावला. मुंबई येथील कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. आनंदा गांगुर्डे व प्रा. डॉ. संजय खिलारे यांनी केले.

मागील काही वर्षांपासून करिअर कट्टाचे विविध उपक्रम यशस्वीपणे राबवून विद्या प्रतिष्ठान महाविद्यालयाने राज्यात आपला वेगळा ठसा उमटवला आहे. या यशाचे श्रेय प्राचार्य डॉ. भरत शिंदे, उपप्राचार्य डॉ. लालासाहेब काशिद, डॉ. शामराव घाडगे तसेच करिअर कट्टा समितीच्या सर्व सदस्यांना असल्याचे प्रा. डॉ. ओगले व प्रा. डॉ. खिलारे यांनी सांगितले. या पुरस्काराबद्दल संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. प्रभुणे, सचिव ॲड. नीलिमा गुजर, खजिनदार युगेंद्र पवार व सर्व विश्वस्तांनी अभिनंदन केले.

## प्राईम लाईफ




## पॉझिटिव्ह आणि नेगेटिव्ह रक्तामध्ये नेमका फरक काय?

जेव्हा आपण रक्तदान करतो किंवा रक्ताची चाचणी करतो, तेव्हा आपल्याला 'A+', 'B-', किंवा 'O+' असे गट सांगितले जातात. पण तुम्ही कधी विचार केला आहे का, की रक्ताच्या गटासोबत असणारे हे पॉझिटिव्ह (+) आणि नेगेटिव्ह (-) चिन्ह नेमकं काय असतं? रक्ताचा रंग तर सर्वांचा सारखाच लाल असतो, मग हा फरक पडतो कुठे? विज्ञानाच्या भाषेत सांगायचे तर, हा संपूर्ण खेळ 'Rh फॅक्टर' नावाच्या एका प्रथिनावर अवलंबून असतो.

नेमकं काय आहे हे 'पॉझिटिव्ह' आणि 'नेगेटिव्ह'?

आपल्या रक्तातील लाल पेशींच्या पृष्ठभागावर विशिष्ट प्रकारचे ॲंटिजेन्स असतात. यातील सर्वात महत्त्वाचा ॲंटिजेन म्हणजे 'डी ॲंटिजेन', ज्याला आपण 'आरएच फॅक्टर' म्हणतो.

'आरएच पॉझिटिव्ह (+) : जर तुमच्या रक्तातील लाल पेशींच्या पृष्ठभागावर हे प्रथिन असेल, तर तुमचा ब्लड ग्रुप 'पॉझिटिव्ह' असतो. जगात सुमारे ८५% लोकांचा ब्लड ग्रुप पॉझिटिव्ह असतो.

आरएच नेगेटिव्ह (-): जर तुमच्या रक्तात हे प्रथिन नसेल, तर तुमचा ब्लड ग्रुप 'नेगेटिव्ह' मानला जातो. हा गट अत्यंत दुर्मिळ असतो.

दोन्ही गटांमध्ये नेमका फरक काय?

दैनंदिन जीवनात या दोन्ही गटांच्या लोकांमध्ये कोणताही शारीरिक फरक नसतो. दोघांचीही ताकद, बुद्धिमत्ता किंवा रोगप्रतिकारशक्ती सारखीच असू शकते. फरक फक्त दोनच वेळी महत्त्वाचा ठरतो. रक्त देताना किंवा घेताना हा गट तपासावा लागतो. आई आणि बाळ यांचे आरएच फॅक्टर वेगळे असतील तर डॉक्टरांना विशेष काळजी घ्यावी लागते.

नेगेटिव्ह ब्लड ग्रुप दुर्मिळ का?

हे पूर्णपणे जनुकीय असते. जर आई आणि वडील दोघांचाही ग्रुप नेगेटिव्ह असेल, तर मुलाचा ग्रुपही नेगेटिव्ह असतो. मात्र, पॉझिटिव्ह गट हा 'डोमिनंट' असल्याने तो जास्त प्रमाणात आढळतो.

# निंबूत तलाठी कार्यालयातील खाजगी इसम १५ हजाराची लाच स्वीकारताना एसीबीच्या जाळ्यात

**पुणे, ता. ५ :** सातबारा उताऱ्यावर नोंद करण्यासाठी १५ हजार रुपयांची लाच स्वीकारताना निंबूत (ता. बारामती) येथील तलाठी कार्यालयाशी संबंधित असलेल्या एका खाजगी इसमाला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने रंगेहात पकडले. ही कारवाई बारामती-निरा रोडवरील इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ, निंबूत खंडोबाचीवाडी येथे बुधवारी (ता. ४) सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास करण्यात आली. या कारवाईमुळे बारामती महसूल विभागात एकच खळबळ उडाली आहे.

सोमनाथ संपत महानवर (वय ३५, रा. गडदरवाडी, पोस्ट खंडोबाचीवाडी, ता. बारामती) असे लाच स्वीकारताना रंगेहात पकडण्यात आलेल्या खाजगी इसमाचे नाव आहे. तो तलाठी कार्यालयाशी संबंधित कोतवाल असल्याचे सांगत काम करत होता; मात्र तपासात तो प्रत्यक्षात खाजगी इसम असल्याचे निष्पन्न झाले आहे. याप्रकरणी एका ३१ वर्षीय व्यक्तीने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे तक्रार केली होती.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार व्यवसायाने शेतकरी असून त्यांच्या मौजे निंबूत येथील गट क्रमांक ८६/२ मधील ६ गुंठ्यांच्या प्लॉटची फाळणी झाली आहे. बारामती येथील उपअधीक्षक भूमिअभिलेख कार्यालयाने संबंधित प्लॉटच्या सातबारा नोंदी करण्याबाबत तहसीलदार, बारामती यांना पत्राद्वारे कळविले होते. त्यानुसार तहसीलदारांनी ११ फेब्रुवारी २०२६ रोजी निंबूत येथील तलाठी जयश्री तनपुरे यांना सातबारा नोंद करण्याचे आदेश दिले होते.

तक्रारदार यांनी १८ फेब्रुवारी रोजी निंबूत तलाठी कार्यालयात चौकशी केली असता तेथे उपस्थित असलेल्या आरोपी महानवर याने तलाठी जयश्री तनपुरे व मंडलाधिकारी मोहिते यांच्यासाठी प्रत्येक प्लॉटसाठी ५ हजार रुपये प्रमाणे चार प्लॉटसाठी एकूण २० हजार रुपये द्यावे लागतील, अशी लाचेची मागणी केली होती. याबाबत तक्रारदार यांनी २५ फेब्रुवारी रोजी एसीबीकडे तक्रार केली होती.

मिळालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने पडताळणी केली असता आरोपी महानवर याने पुन्हा लाच मागितल्याचे निष्पन्न झाले. तसेच ३ मार्च रोजी आरोपीने तक्रारदाराला फोन करून सातबारा नोंदी झाल्याचे सांगितले आणि पेमेंट पाठवा असा व्हॉट्सॲप संदेशही पाठविला. ४ मार्च रोजी झालेल्या पुढील पडताळणीदरम्यान आरोपी महानवर याने मंडलाधिकारी मोहिते यांच्यासाठी तडजोडीअंती १५ हजार रुपये लाचेची मागणी केल्याचे स्पष्ट झाले. त्यानुसार एसीबीने सापळा रचला. दरम्यान, बारामती-निरा रोडवरील इंडियन ऑईल पेट्रोल पंपाजवळ आरोपीने तक्रारदाराकडून १५ हजार रुपये लाच स्वीकारताच एसीबीच्या पथकाने त्याला रंगेहात पकडले. याप्रकरणी आरोपी सोमनाथ महानवर यांच्यावर वडगाव निंबाळकर पोलीस ठाण्यात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायदा १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक सुहास हट्टेकर करत आहेत

# शिवाजीनगर कोर्टात दोन महिला वकिलांमध्ये तुफान राडा


**पुणे, ता. ५ :** पुणे शहरातील शिवाजीनगर येथील जिल्हा न्यायालयाच्या आवारात दोन महिला वकिलांमध्ये मारहाणीची घटना घडली आहे. न्यायालयीन प्रकरणांवरून झालेल्या वादातून हा प्रकार समोर आला असून एका ४२ वर्षीय वकिलेला दुखापत झाली आहे. या प्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी संबंधित महिला वकिलाविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे.

माहितीनुसार, तक्रारदार महिला गेल्या दीड वर्षांपासून मोटर वाहन न्यायालयात वकिली करत आहेत. प्रकरणे मिळण्याच्या मुद्द्यावरून दोघींमध्ये काही दिवसांपासून वाद सुरू होता. २४ फेब्रुवारी रोजी सकाळी न्यायालयात दोघींमध्ये पुन्हा वाद झाला.

दुपारी तक्रारदार न्यायालयातून बाहेर पडत असताना आरोपी महिलेनं त्यांना अडवून शिवीगाळ केली आणि मारहाण केली, असा आरोप आहे.

या दरम्यान दोघींमध्ये झटापट झाली. आरोपी महिलेने हातातील टोकदार वस्तूने डोक्यावर वार केल्याचे तक्रारीत नमूद आहे. यात जखमी वकिलेला रक्तस्त्राव झाला आणि त्यांना चक्कर आली. उपस्थितांनी तातडीने हस्तक्षेप करत जखमी महिलेला जवळच्या खासगी रुग्णालयात दाखल केले.

घटनेची माहिती मिळताच पोलीस घटनास्थळी पोहोचले. वरिष्ठ पोलीस निरीक्षकांच्या माहितीनुसार, मारहाण प्रकरणी गुन्हा नोंदवण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. न्यायालयाच्या परिसरात घडलेल्या या प्रकारामुळे वकील वर्गात चर्चा सुरू आहे.



# पुणेकरांसाठी १० हजार कोटींची गुंतवणूक आणि हजारो नोकऱ्या

**पुणे, ता. ५ :** महाराष्ट्राच्या ऊर्जा क्षेत्रात क्रांती घडवून आणणारा एक अत्यंत महत्त्वाचा पाऊल उचलण्यात आले आहे. पुणे आणि रायगड जिल्ह्यांच्या सीमेवर २१००मेगावॉट क्षमतेचा 'पिंपळपाडा-सावळे उदंचन जलविद्युत प्रकल्प' उभारण्यासाठी राज्य सरकार आणि चॅम्बेरी पॉवर यांच्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत सामंजस्य करार करण्यात आला. हा केवळ एक प्रकल्प नसून, राज्याच्या औद्योगिक प्रगतीला वेग देणारा 'पॉवर हाऊस' ठरणार आहे.

उदंचन जलविद्युत तंत्रज्ञान हे बॅटरीसारखे काम करते. जेव्हा विजेची मागणी कमी असते, तेव्हा पाणी उंचावर साठवले जाते आणि मागणी वाढताच ते वेगाने खाली सोडून वीज निर्माण केली जाते. चॅम्बेरी पॉवर (ईडीएफ सोल्युशन समूहाची कंपनी) या प्रकल्पात तब्बल १० हजार २१७ कोटी रुपयांची गुंतवणूक करणार आहे. या प्रकल्पामुळे पुणे आणि रायगड परिसरातील अंदाजे २,५००तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. सौर आणि पवन ऊर्जा दिवसा उपलब्ध असते, मात्र रात्री किंवा आपत्कालीन परिस्थितीत विजेचा तुटवडा भासतो. हा प्रकल्प ऊर्जा साठवणुकीचे काम करेल, ज्यामुळे महाराष्ट्राचा वीजपुरवठा अधिक स्थिर आणि सुरक्षित होईल. महाराष्ट्राने अशा एकूण ५५ प्रकल्पांचे उद्दिष्ट ठेवले असून, त्यातून सुमारे ४.१७ लाख कोटींची गुंतवणूक आणि लाखो लोकांसाठी रोजगार अपेक्षित आहे. या प्रकल्पातून राज्याला वार्षिक १,७६२ कोटी रुपयांचा महसूल मिळेल.

# पुण्यासह राज्यात अनेक ठिकाणी धावणार शिवनेरी बस

**मुंबई, ता. ५ :** मुंबई पुणे महामार्गाचीराणीम्हणूनओळख असलेल्या शिवनेरी बस सेवेचा विस्तार आता राज्यातील इतर शहरांपर्यंत करण्यात येणार आहे. परिवहन मंत्री तथा एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी ही माहिती दिली. लवकरच मुंबईपुणे मार्गाबरोबरच महाराष्ट्रातील प्रमुख शहरांदरम्यानही शिवनेरी बस धावणार आहे.




सन २००२ मध्ये सुरू झालेल्या या सेवेने वेळेचे काटेकोर पालन, आरामदायी आसनव्यवस्था आणि सुरक्षित प्रवासामुळे प्रवाशांचा विश्वास मिळवला आहे. तिकीट दर इतर बसपेक्षा थोडे जास्त असले तरी प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत असल्याने ही सेवा नफ्यात असल्याचे सांगण्यात आले.

या शहरात धावणार शिवनेरी राज्यभर विस्तारासाठी २०० नवीन अत्याधुनिक व्होल्व्हो बसेस खरेदी करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या बसेस ताफ्यात दाखल झाल्यानंतर नाशिक-पुणे, नाशिक छत्रपती संभाजीनगर, नाशिक-जळगाव-धुळे, पुणे-कोल्हापूर, पुणे-सांगली, पुणे-सोलापूर, नागपूर-चंद्रपूर आणि नागपूर-अमरावती-अकोला अशा मार्गांवर सेवा सुरू करण्याचे नियोजन आहे. त्यामुळे विविध भागांतील प्रवाशांना सुरक्षित आणि सोयीस्कर प्रवासाचा पर्याय मिळणार आहे.

सध्या दादरस्वारगेट, दादर-शिवाजीनगर, बोरीवली-स्वारगेट, बोरीवली-शिवाजीनगर, ठाणे- स्वारगेट आणि ठाणे-शिवाजीनगर या मार्गांवर ई-शिवनेरी बस सेवा सुरू असून तिला चांगला प्रतिसाद मिळत आहे. महिला प्रवासी तसेच ६५ ते ७५ वयोगटातील ज्येष्ठ नागरिकांना ५० टक्के सवलत, तर ७५ वर्षांवरील नागरिकांना मोफत प्रवासाची सुविधा आहे.

नवीन २०० बसेसमध्ये ३० शयनयान बसेसचा समावेश असेल. दीर्घ पल्ल्याच्या प्रवासासाठी स्लिपर सुविधा उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

# महाविकास आघाडीकडून शरद पवार पुन्हा राज्यसभेवर जाणार?

**मुंबई, ता. ५ :** राज्यसभेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीकडून शरद पवार यांच्या नावावर अंतिम निर्णय घेण्यात आला आहे. अर्ज भरण्याच्या शेवटच्या टप्प्यात हा निर्णय जाहीर करण्यात आला. शरद पवार गुरुवारी उमेदवारी अर्जदाखल करणार असल्याची माहिती मिळत आहे. त्यांना पाठिंबा देणाऱ्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या १० आमदारांचे समर्थनपत्रही तयार ठेवण्यात आले आहे.

महाराष्ट्रातील राज्यसभेच्या एकूण ७ जागा लवकरच रिक्त होणार आहेत. या जागांसाठी १६ मार्च रोजी मतदान होणार आहे. भारतीय जनता पक्षाने आपल्या ४ उमेदवारांची नावे जाहीर केली आहेत. त्यानंतर महाविकास आघाडीत चर्चा सुरू होती. अखेर शरद पवार यांच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब करण्यात आले.



दरम्यान, उमेदवारी अर्ज भरण्यासाठी शरद पवार स्वतः उपस्थित राहतील की नाही, याबाबत अनिश्चितता आहे. त्यांच्या प्रकृतीच्या कारणामुळे ते प्रत्यक्ष निवडणूक कार्यालयात जाण्याची शक्यता कमी असल्याचे बोलले जात आहे. आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी संबंधित अधिकारी त्यांच्या निवासस्थानी जाऊ शकतात, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे.

अलीकडेच त्यांना मुंबईतील रुग्णालयातून डिस्चार्ज देण्यात आला असून ते सध्या विश्रांती घेत आहेत. त्यांच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होत असल्याचे सांगण्यात येत आहे. दरम्यान, महाविकास आघाडी एकत्र असून पवार यांना सर्व घटक पक्षांचा पाठिंबा असल्याचे नेत्यांनी स्पष्ट केले आहे. निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# वहिनीवर अत्याचार करणाऱ्या नराधम दिराला १० वर्षांची कोठडी

**पुणे, ता. ५ :** वहिनीवर अत्याचार केल्याच्या प्रकरणात बारामती येथील अतिरिक्त सत्र न्यायालयाने आरोपीला १० वर्षे सक्तमजुरी आणि २० हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. पीडित महिलेची साक्ष विश्वासार्ह असल्याचे न्यायालयाने नमूद केले असून तिच्या साक्षीला पती, वैद्यकीय अधिकारी आणि न्यायवैद्यक तपासणी अहवालानेही पुष्टी दिली. अतिरिक्त सत्र न्यायाधीश बी. डी. शेळकेयांनी हा निकाल दिला.



या प्रकरणी पीडित महिलेने बारामती शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेनुसार गुन्हा नोंदवण्यात आला. ही घटना १४ जून २०२४ रोजी दुपारी सुमारे ३.३० वाजता बारामतीतील प्रगतीनगर परिसरात घडली होती.

माहितीनुसार, पीडित महिलेचे पती सुरक्षारक्षक म्हणून काम करतात. घटनेच्या दिवशी ते कामावर गेले असताना आरोपी दुपारी सुमारे १ वाजता महिलेच्या घरी आला. त्यावेळी पीडितेने त्याला चहा दिला. काही वेळानंतर ती पुन्हा चहा करण्यासाठी स्वयंपाकघरात गेली असता आरोपीने तिच्यावर अत्याचार केल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे. या घटनेबाबत कोणाला सांगितल्यास जीवे मारण्याची धमकीही आरोपीने दिल्याचे पीडितेने सांगितले.

घाबरलेल्या अवस्थेत पीडितेने पतीच्या कामाच्या ठिकाणी जाऊन त्यांना घटनेची माहिती दिली. त्यानंतर दोघांनी बारामती शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या खटल्यात अतिरिक्त सरकारी वकील के. एस. नवले यांनी सरकार पक्षाची बाजू मांडली. न्यायालयात एकूण ५ साक्षीदारांची साक्ष नोंदवण्यात आली. पुरावे आणि साक्षी विचारात घेऊन न्यायालयाने आरोपीला दोषी ठरवत शिक्षा सुनावली. तसेच पीडित महिलेच्या पुनर्वसनासाठी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाने भरपाई देण्याचे आदेशही दिले.

# ढोकसांगवी येथील लाईफ केअर हॉस्पिटलमधील गर्भनिदान रॅकेटचा पर्दाफाश

**पुणे, ता. ५ :** शिरूर तालुक्यात मोबाईल ॲपच्या मदतीने बेकायदेशीररीत्या गर्भलिंग निदान करणाऱ्या एका टोळीचा प्रशासनाने पर्दाफाश केला आहे. आरोग्य विभाग आणि गुन्हे शाखेच्या पथकाने ढोकसांगवी येथील लाईफ केअर हॉस्पिटलवर छापा टाकून ही मोठी कारवाई केली. या प्रकरणी बीएएमएस डॉक्टर आकाश सुभाष मलगुंडे आणि एजंट नरेंद्र ठाकरे यांच्यावर गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाचंगे वस्ती परिसरात असलेल्या या रुग्णालयात गर्भलिंग निदानाचे काळे कृत्य सुरू असल्याची माहिती आरोग्य विभागाला मिळाली होती. या माहितीची खात्री करण्यासाठी






प्रशासनाने एक सापळा रचला. यामध्ये वाघोली पोलीस ठाण्यातील महिला पोलीस कर्मचारी प्रतीक्षा पानसरे यांनी डमी रुग्ण बनून रुग्णालयात प्रवेश केला. त्यांच्या मदतीने या संपूर्ण बेकायदेशीर व्यवहाराचे पुरावे पथकाच्या हाती लागले. या कारवाईत समोर आलेली सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, गर्भलिंग निदानासाठी कोणत्याही पारंपारिक मोठ्या मशीनचा वापर न करता चक्क मोबाईल पचा वापर केला जात होता. केसनंद येथील एजंट नरेंद्र ठाकरे याच्या माध्यमातून हे रॅकेट चालवले जात होते. मोबाईल तंत्रज्ञानाचा असा गैरवापर पाहून तपास पथकही चक्रावून गेले. तपासणीदरम्यान रुग्णालयात गर्भपातासाठी वापरल्या जाणाऱ्या बेकायदेशीर गोळ्यांचा मोठा साठा आणि आक्षेपार्ह कागदपत्रे आढळून आली आहेत. पोलिसांनी रुग्णालयातील सर्व साहित्य जप्त करून क्लिनिक सील केले आहे.

ही धाडसी कारवाई पुणे आरोग्य मंडळाचे उपसंचालक डॉ. भगवान पवार आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. नागनाथ येम्पल्ले यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आली.

जिल्हा प्रशासनाने या घटनेनंतर कडक इशारा दिला असून गर्भलिंग निदान करणे हा कायद्याने गंभीर गुन्हा असल्याचे स्पष्ट केले आहे. अशा प्रकारच्या बेकायदेशीर कामात सहभागी असलेल्या लोकांची गय केली जाणार नाही, असे प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे.